जात आणि कायदा : भारताबाहेरील चित्र

चन्द्रशेखर पुरन्दरे

जात किंवा जातसदृश व्यवस्थेतील विषमतेचा पुरस्कार समाजातील मुख्य प्रवाह करतो व म्हणून राज्यसंस्थाही करते. भारतात राज्यसंस्था अधिकृतपणे जातीव्यवस्थेविरुद्ध बोलते, कायदेही करते, पण कायद्यांची अंमलबजावणी नीट होत नाही आणि कायद्याच्या धाकाने अशा अनिष्ट घटना घडणे कमी होत असल्याचे दिसत नाही. मग घटना घडल्यानंतरच कायद्याकडे धाव घेतली जाते. शिवाय, घटना मुळात घडूच नयेत यासाठी कायद्याखेरीज इतर व्यवस्था-मानवी हक्क संघटना किंवा नागरी संघटना-सक्रिय नसते. जगातील काही देशात तर कायद्यानेच जातसदृश व्यवस्थेला मान्यता आहे. मग या व्यवस्थेतील अन्यायाची दाद कोणाकडेही मागायची मुभा राहत नाही.

जातसदृश व्यवस्था, जगाच्या विकसित, विकसनशील आणि अविकसित अशा सर्व भागात आढळतात. या व्यवस्थेमुळे होणाऱ्या हिंसक घटना भारतात जशा वाढत आहेत, तशाच जगभरही वाढत आहेत. दोन प्रक्रिया या वाढीला कारणीभूत दिसतात. आमचा धर्म/वंश/जीवनपद्धती, थोडक्यात अस्मिता ही इतर समाजांच्या अस्मितेहून श्रेष्ठ आहे हा पक्का समज ही एक प्रक्रिया आणि जागतिकीकरण ही दुसरी प्रक्रिया.

अस्मिता ही प्रक्रिया म्हणण्याचे कारण म्हणजे ती ऐतिहासिक विश्वासावर आधारित असते. पण इतिहास कोण, कोणासाठी लिहितो यावर त्याचा रोख आणि निष्कर्ष अवलंबून राहतात. त्यामुळे 'खरा' वस्तुनिष्ठ इतिहास असा नसतोच. वर्तमानातील घटनांनी इतिहासाचा रंग बदलत जातो, कधीकधी ऐतिहासिक घटनांना विपर्यस्त स्वरूपही दिले जाते आणि त्यावर आधारित आजची अस्मिताही बदलते.

विभिन्न समाज एकेमकांपासून पूर्णत: विभक्त असते तर संघर्षाची वेळ कदाचित आली नसती. पण जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे विकासाच्या निरनिराळ्या टप्प्यांवर असणारे आणि विभिन्न संस्कृती असणारे समाज आज एकमेकांजवळ ढकलले जात आहेत. जागतिकीकरणाचा परिणाम फक्त भारतातच नव्हे तर जगातील सगळ्याच देशांत वेगवेगळ्या थरांवर होत आहे. विशेषत: आर्थिक क्षेत्रामुळे होणारे विस्थापन, पर्यावरणातील वाढते प्रदूषण हे जसे तिसऱ्या जगात होत आहे तसेच आर्थिक दिवाळखोरी, नोकऱ्यांची अनिश्चितता या स्वरूपात हे परिणाम पहिल्या जगात दिसत आहेत. या अनपेक्षित अनिश्चिततेमुळे आणि दृश्य 'शत्रू' नसल्याने 'बाहेरच्यांना संकटासाठी जबाबदार धरण्याची वृत्ती' वाढीस लागलेली आहे. मग ते ऑस्ट्रेलियातील भारतीय विद्यार्थ्यांवरील हल्ले असोत किंवा फ्रान्समधील बुरख्यावरील बंदी असो. या सामाजिक उलथापालथीत वर्गभेदही तीव्र होत आहेत. पण फक्त वर्ग किंवा फक्त परंपरा किंवा वर्ग-आणि-परंपरा याने या संघर्षाचा समाधानकारक खुलासा होत नाही. त्यासाठी पुरातत्त्वशास्त्रासारख्या मूलभूत मानवी प्रवृत्तीच्या अभ्यासाची जरूरी दिसते. तो मुद्दा लेखाच्या शेवटी मांडला आहे.

जागतिकीकरणाने जातीचे महत्त्व कमी होईल अशी एक अपेक्षा होती. तसे होताना दिसत नाही, किंबहुना हे महत्त्व वाढतानाच दिसते. मुळात ही अपेक्षाच कशी होती हे कळत नाही. मार्क्सवादी प्रतिपादनानुसार ज्याच्या हाती उत्पादनाच्या साधनांची मालकी असते, तो वर्ग समाजात वरिष्ठ असतो. या शतकामध्ये उत्पादनाच्या पारंपारिक साधनांबरोबरच (म्हणजे जमीन, पाणी, वीज, कच्चा माल, तंत्रज्ञान वगैरे बरोबरच) माहिती-संपर्क व ज्ञान यांची उपलब्धताही उत्पादनाचे परस्परसंबंध ठरवतात. ही उपलब्धता खालच्या जातींकडे जाईल या अपेक्षेला आधारच नव्हता आणि तसे घडताना दिसतही नाही. म्हणजे, जागतिकीकरण पूर्ण सामर्थ्याने भारतावर आदळण्याआधी, ९० पर्यंत, जर ही मालकी सवर्णांकडे होती तर आता ती जागतिक अर्थसंस्था, बहुराष्ट्रीय कंपन्या व त्यांच्या इशाऱ्यावर नाचणारी स्थानिक सरकारे यांच्याकडे गेली आहे. त्यांचे स्थानिक हस्तक सवर्ण किंवा उच्चपदस्थ दलित असतीलही पण मालकी समाजाच्या परिघावरील घटकांकडे आधीही नव्हती, आताही नाही. वस्तुत: जी काही मालकी या घटकांकडे आजवर होती, तीही हिसकावून घेतली जात आहे. विस्थापन हे एक उदाहरण. झारखंड, छत्तीसगढ, ओरिसामधील नव्या खाणी व कारखान्यांना दिले गेलेले परवाने आदिवासींची जीवनव्यवस्थाच धोक्यात आणत आहेत.

जातसदृश व्यवस्था जगभर आहेत. म्हणजे जगात सगळीकडे हे घडते आहे, तेच भारतात होते आहे, असा निष्कर्ष लेखावरून काढू नये. या व्यवस्था जगात किती अत्याचारी आहेत, त्यांची कारणे व परिस्थिती काय आहे, याचे जागतिक भान ठेवले नाही तर जातीविरोधी संघर्ष एका संकुचित संदर्भचौकटीत अडकण्याचा संभव आहे. ही संदर्भचौकट विस्तृत करणे हा या लेखाचा उद्देश आहे.

प्रथम भारताबाहेरील जातसदृश व्यवस्था पाहू. ही यादी अनंत आहे. यातील प्रत्येक उदाहरणाचे सखोल विश्लेषण एका लेखाच्या मर्यादेत अशक्य आहे. म्हणून दोन-चार प्रातिनिधिक उदाहरणे घेतली आहेत. अशा व्यवस्था जगात प्रामुख्याने वर्ण,

वंश आणि धार्मिक श्रद्धा या अनुषंगाने आढळतात. त्यात बहुसंख्य कोण, आर्थिकदृष्ट्या बळकट कोण यावर आपोआपच वरिष्ठ-कनिष्ठ अशी उतरंड होते. अमेरिका, युरोप या खंडांत गोरे बहुसंख्य आहेत. अमेरिकेत आफ्रिकेतून कृष्णवर्णीयांना सक्तीने गुलाम म्हणून आणले होते. त्यांच्यावर प्रसंगी जातीव्यवस्थेपेक्षाही गंभीर अत्याचार झाले. युरोपमधील निरनिराळ्या देशात गेल्या साठ-सत्तर वर्षांत प्रामुख्याने आधीच्या वसाहतीतील निरनिराळ्या वंशाचे लोक आले. ते मुख्यत: उपजीविकेसाठी आले. उच्चशिक्षणासाठी आलेल्यांची संख्या त्यामानाने अगदीच कमी आहे. उदाहरणार्थ, जर्मनीमध्ये तुर्क, ब्रिटनमध्ये बांगलादेशी आणि पाकिस्तानी, फ्रान्समध्ये उत्तर आफ्रिकेतील अल्जीरिया, मोरोक्को या आधीच्या वसाहतीतील लोक आले. ते आता दुसऱ्या किंवा तिसऱ्या पिढीत आहेत आणि त्या-त्या देशाचे अधिकृत नागरिकही आहेत. पण त्यांना या ना त्या स्वरूपाच्या 'जातीय' छळाचा त्रास होतो. या वर्णभेदाचे उदाहरण म्हणून फ्रान्समधील परिस्थिती पुढे तपासली आहे. हे विकसित देशाचे म्हणून एक उदाहरणही मानता येईल.

वंशभेदाचे उदाहरण म्हणजे आफ्रिकेतील अनेक देशांत एका टोळीचे लोक स्वत:ला शेजारच्या किंवा त्यांच्याच खेड्यात, वस्तीत शतकानुशतके राहत असलेल्या दुसऱ्या टोळीच्या लोकांना तुच्छ मानतात. बाहेरच्या माणसाला दोन्ही टोळ्या कृष्णवर्णीय वाटल्या तरी त्यांच्यातील अंतर्गत भेद इतक्या प्रखरतेने पाळले जातात की अस्पृश्यतेची आठवण यावी. जमिनीची मालकी, खरे किंवा काल्पनिक ऐतिहासिक अपमान, पाण्यावरचा हक्क अशा अनेक कारणांनी ही टोळीयुद्धे अनेक वर्षे चालू आहेत. हा जगातील अविकसित भाग आहे. त्यातील सगळ्यात भयानक हत्याकांड १९९४ साली हुतू आणि तुत्सी वंशाच्या लोकांत झाले. बुरूंडी नावाचा देश १९६२ साली बेल्जिअम या युरोपियन देशाच्या वसाहतवादातून स्वतंत्र झाला. तेव्हापासूनच या दोन टोळ्यांत असंतोष होता. एकमेकांच्या कत्तली ७२ सालपासून चालू होत्या. १९९३ ते २००५ पर्यंत चाललेल्या कत्तलीत सुमारे साडेतीन लाख तुत्सी लोक हुतू लोकांनी ठार मारले. जवळजवळ एक लाख तर पहिल्या वर्षी मारले गेले. त्याचा प्रतिसाद शेजारच्या रुवांडा नावाच्या देशात उमटला. तिथे ६ एप्रिल ते मध्य जुलै १९९४ मध्ये म्हणजे सुमारे शंभर दिवसांत किमान आठ लाख लोक मारले गेले. त्यातले बहुतांश तुत्सी होते. पण तुत्सींबरोबर समझोत्याने रहावे अशा मताचे हुतू वंशाचे लोकही होते. ही तर प्रत्यक्ष ठार मारले गेलेल्यांची संख्या. कायमचे अपंग, बलात्कारित स्त्रिया, हिंसाचाराचे इतर बळी, मनोरुग्ण यांचा केवळ अंदाजच आहे. वंशद्वेष काय थराला जाऊ शकतो यांचे मानवी इतिहासातील सगळ्यात भयानक उदाहरणांपैकी हे उदाहरण असावे. दुसऱ्या महायुद्धातील ज्यूंचे हत्याकांड, स्टॅलिनच्या राजवटीतील रशियातील हत्याकांडे, चीनमधील हानवंशीय नसलेल्या, तिबेटी, वीघर, तुर्क वगैरेंची हत्याकांडे, तुर्कांनी केलेली अर्मेनियन वंशाच्या लोकांची कत्तल, ही अलिकडच्या काळातील इतर उदाहरणे. इथे वर्गमीमांसा फारशी उपयोगी पडत नाही. हुतू लोकांना गुलाम करण्याचा तुत्सी लोकांचा डाव आहे. हा समज आफ्रिकेतील हत्याकांडाला प्रामुख्याने जबाबदार होता.

आंतरराष्ट्रीय 'जाती'व्यवस्थेचा तिसरा प्रकार म्हणजे धार्मिक श्रद्धा. ज्यू-मुस्लिम, ख्रिश्चन-मुस्लिम, ख्रिश्चन-ज्यू असे संघर्ष गेल्या शतकात झालेले आहेत आणि आजही पॅलेस्टाईन प्रश्न किंवा इस्लामी मूलतत्त्ववाद्यांनी ख्रिश्चन पश्चिमेविरुद्ध आरंभलेल्या युद्धात चालू आहेत. पण एकाच धर्माअंतर्गत दोन पंथांत चालू असलेल्या किंवा दोन वंशांत चालू असलेल्या संघर्षातही लाखोंनी लोक मारले जातात. काही वेळा राज्यसंस्थाच ही हत्या करते पण दुसऱ्या पंथाचे सामान्य लोकही त्यात पुढाकार घेतात. सध्या चालू असलेली मुस्लिम धर्मांतर्गत हत्याकांडे उदाहरण म्हणून घेतली आहेत. पहिले उदाहरण पाकिस्तानचे आहे, दुसरे तुर्कस्तानचे आहे. दोन्ही देश विकसनशील मानले जातात. त्यादृष्टीने ते भारताचा विकासाच्या टप्प्यावरचे मानता येतील.

पाकिस्तान

अहमदिया पंथाचे अनुयायी मुस्लिम आहेत असे इतर मुस्लिम मान्य करत नाहीत. वस्तुत: १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात मिर्झा गुलाम अहमद या त्यावेळच्या ब्रिटिश भारतातील मुस्लिम संताने 'खऱ्या' मुस्लिम धर्माची जगभर प्रसार करण्यासाठी ही चळवळ चालू केली. या संताला त्याचे अनुयायी मुहम्मदानंतरचा प्रेषित मानतात. इतर मुस्लिमांच्या मते आजवर मुहम्मदानंतर प्रेषित जन्माला आलेला नाही. तसा दावा जर कोणी करत असेल, तर हा मुस्लिम धर्माचा द्रोह आणि त्याला काफिर समजावे. अहमदियापंथीय बांगलादेश-भारत-पाकिस्तान-अफगाणिस्तान या उपखंडात आहेत आणि इंडोनेशिया, इजिप्त या इतर मुस्लिम देशांतही आहेत. त्यांचे रीतीरिवाज, सण, शुक्रवारचे नमाज वगैरे श्रद्धा मुसलमानांसारख्याच आहेत आणि ते स्वत:ला मुसलमानच समजतात. पाकिस्तानात आज जवळजवळ ४० लाख अहमदिया आहेत. त्यांच्याविरुद्ध पहिल्यापासून इतर सुन्नी मुस्लिमांना आकस आहे. त्यामुळे त्यांच्या कत्तलीही होत असतात. १९५३, १९७४ ला मोठे दंगेही झाले होते. १९५३ ला २००० अहमदियांना केवळ अहमदिया असल्याबद्दल ठार मारण्यात आले होते. १९७४ च्या दंग्यांनंतर त्यावेळचे पंतप्रधान झुल्फिकार अलि भुट्टो यांनी घटनादुरुस्ती करून अहमदिया

मुस्लिम नाहीत असा कायदा केला. भुट्टोमहाशय लोकशाही मार्गाने निर्वाचित होऊन सत्तेवर आले होते हे विशेष. नंतर १९८४ मध्ये तेव्हाचा लष्करशहा झिया उल हक याने आणखी कायदे करून अहमदियांचे मूलभूत मानवी हक्कच काढून घेतले. त्यांनी आपण मुस्लिम आहोत असा दावा केला, अहमदिया पंथाचा प्रचार केला, तर तीन वर्षांपर्यंत सक्त मजुरी करावी लागेल व दंडही भरायला लागेल अशी कायद्याने तरतूद केली. रक्बा नावाचे गाव हे अहमदियांचे प्रमुख गाव. तेथे जवळजवळ ९० टक्के लोक अहमदिया होते. ३५,००० लोकसंख्येचे हे संपूर्ण गावच गुन्हेगार म्हणून जाहीर करण्यात आले. त्यांची मालमत्ताही लुटणे, त्यांना व्यवसाय करू न देणे, त्यांच्या मशिदींवर हल्ले करणे असे इतर प्रकार सतत चालू असतात. शाळांमध्ये या पंथाविरुद्ध शिक्षण देण्यात येते. मग नवीन पिढीही द्वेष आत्मसात करते. नोकऱ्या, सामाजिक अभिसरण सगळ्याच बाजूंनी अहमदियांची कोंडी करण्यात येते. घरावर रोषणाई करण्यास, उत्सव साजरे करण्यास, अगदी सार्वजनिकरीत्या खेळ आयोजित करण्यासही अहमदियांना कायद्याने बंदी आहे. त्यांना त्याचे साहित्य, वर्तमानपत्रे प्रसिद्ध करता येत नाहीत.

१९९५ साली डॉ.रशीद अहमद आणि त्यांचा जावई हे दोन अहमदियापंथीय काही कामासाठी शब कदार नावाच्या गावातील कोर्टात गेले असता तेथे घुसून त्यांना बाहेर काढण्यात आले. जावयाला भर दिवसा, रस्त्यावर दगडांनी ठेचून ठार मारण्यात आले. तिथे पोलीस हजर होते. जावयाने पोलिसांना विनंती करूनही पोलीस हा तमाशा पाहत राहिले. ठार मारल्यावर प्रेतावरचे कपडे काढून मृतदेह गावातून फरफटत नेण्यात आला. रशीद अहमद गंभीर जखमी झाले.

अगदी यावर्षीच्या २८ मे ला लाहोरमधील अहमदियांच्या मशिदीवर ऐन नमाजाच्या वेळी हल्ला झाला. त्यात ९० लोक ठार मेले आणि शंभराहून अधिक जखमी झाले.

अफगाणिस्तानात तर १९०१ सालापासून अहमदियांना दगडांनी ठेचून सार्वजनिकरित्या ठार मारण्याचे प्रकार घडलेले आहेत. इंडोनेशियात बहुसंख्य मुस्लिमांच्या दडपणाखाली अहमदिया मुस्लिम धर्मात बसत नाहीत हे कायद्याने जाहीर व्हायचे फक्त बाकी आहे. त्यांच्यावरील सामाजिक बहिष्कार व त्यांच्याविरुद्धच्या हिंसक कारवाया पाहता तेथील परिस्थिती अहमदियांच्याबाबत जातीय अत्याचारच म्हणता येईल.

एखाद्या समाजाची श्रद्धास्थाने लक्ष्य करणे हाही प्रकार इंडोनेशियात व पाकिस्तानात घडतो. २००८ साली इंडोनेशियात अहमदियांची एक मशीद जाळण्यात आली. पुतळ्यांची तोडफोड या भारतीय रिवाजाचा हा तिथला अवतार. त्याहून पुढे जाऊन, पाकिस्तानात तर कोणाही नागरिकाला उच्च शिक्षण घ्यायचे असेल किंवा पासपोर्ट मिळवायचा असेल, तर मिर्झा अहमद हा या पंथाचा संस्थापक तोतया प्रेषित होता व मुस्लिमविरोधी होता असे लेखी नमूद करायला लागते.

पाकिस्तान हे विकसनशील राष्ट्राचे एक उदाहरण झाले. जनरल झिया-उलहकच्या कारकीर्दीपासून मुस्लिम मूलतत्त्ववादाला शासकीय पाठिंबा, लष्करशाही व सध्याची अमेरिकेची मदत आणि अंतर्गत ढवळाढवळ या सगळ्या घटकांनी तेथे असंतोष आहे. तात्पर्य, या सामाजिक अस्थैर्याने अशा प्रवृत्तींना खतपाणीच मिळते.

विकसनशील देशाचे दुसरे उदाहरण तुर्कस्तान. तुर्कस्तान आशिया आणि युरोप यांच्या सीमेवरचा देश आहे. तिथे लोकशाही आहे. विशेष म्हणजे बहुसंख्य मुस्लिम असूनही तेथे राज्यसंस्था व धर्मसंस्था यांची कटाक्षाने फारकत करण्यात आलेली आहे. धर्मसंस्थेचा प्रभाव सार्वजनिक व्यवहारावर अजिबात पडू नये यासाठी लष्करच निर्वाचित सरकारवर अंकुश ठेवते. अगदी अलीकडे लष्कराचा प्रभाव जरा कमी झाला आहे आणि थोडाफार मुस्लिम धर्माचा प्रभाव राजकारणात वाढत आहे. पण त्याच्या कारणांचा शोध घेण्याचे या लेखासाठी तरी कारण नाही. कुर्द वंशाच्या लोकांची तुर्कस्तानमधील परिस्थिती जात व कायदा या संदर्भात पाहू.

मध्य आशियाच्या तुर्कस्तान जवळच्या भागात चार प्रमुख वंशाचे मुस्लिम राहतात. अरब, पर्शियन, तुर्क आणि कुर्द, सगळे मुस्लिमच असले तरी त्यांच्यात वंशभेद असतो व श्रद्धांमध्ये फरक असतो. मध्यपूर्वेतील इजिप्त, सीरिया, इराक, सौदी अरेबिया वगैरे राष्ट्रांत प्रामुख्याने अरब राहतात. इराणमध्ये प्रामुख्याने पर्शियन राहतात. कुर्द लोक पूर्वापार तुर्कस्तान, सीरिया, इराण, इराक व आधीच्या रशियाचा तुर्कस्तानला लागून असलेला भाग अशा संलग्न प्रदेशात राहत आलेले आहेत. १९२० च्या सुमारास, पहिल्या महायुद्धानंतर युरोपियन देशांच्या पुढाकाराने प्रथमच या देशांच्या सीमा निश्चित करण्यात आल्या. तेव्हा ब्रिटनने कुर्द लोकांना त्यांचा स्वतंत्र देश देण्याचे आश्वासन दिले होते. ते आश्वासन पाळले गेले नाही. त्यामुळे आज स्वत:चे राष्ट्र नसलेला इतक्या मोठ्या संख्येचा जगात कुर्द हा एकच वंश समूह आहे. त्यांची एकूण संख्या सुमारे साडेतीन कोटी असावी. पण तुर्कस्तान, सीरिया, इराण आणि इराक यांच्या सीमा नक्की झाल्यावर त्या प्रत्येक देशात कुर्द अल्पसंख्यांक झाले. त्यांच्या परंपरा व श्रद्धा या प्रत्येक देशातील मुख्य प्रवाहापासून निराळ्या आहेत आणि स्वतंत्र राष्ट्राचे त्यांचे स्वप्नही प्रत्यक्षात आले नाही त्यामुळे चारही देशांत त्यांच्याकडे संशयाने पाहिले जाते. त्यात ९१ च्या इराक युद्धानंतर उत्तर इराकच्या कुर्द बहुसंख्यांक असणारा भाग अमेरिकेच्या दडपणामुळे पुष्कळ स्वायत्त झाला

पण इराण, सीरिया, तुर्कस्तानमध्ये कुर्द लोकांना वांशिक दडपशाही सहन करावी लागते. हे लोक परंपरेने भटके मेंढपाळ होते. पण तुर्कस्तान, सीरिया वगैरे सीमा निर्धारित झाल्याने त्यांचे भ्रमण थांबले. म्हणजे, तुर्कस्तानमधील कुर्द शेजारच्या सीरियाला आता सहज जाऊ शकत नाही. आपल्याकडे नागालँड, मणिपूर व म्यानमार (ब्रह्मदेश) या सीमेवर नागा लोकांची भारतीय स्वातंत्र्यानंतर हीच परिस्थिती झाली.

सीरियाने तर त्यांच्या देशातील एक लाख वीस हजार कुर्द लोकांचे नागरिकत्वच १९६४ साली रद्द केले. हे लोक तुर्कस्तान व इराकमधून बेकायदेशीररीत्या सीरियात आले आहेत असे कायद्याने जाहीर केले.

तुर्कस्तानच्या स्थापनेपासून म्हणजे १९२०-३० च्या दशकापासून तेथेही कुर्द लोकांची स्वतंत्र अस्मिताच कायद्याने नाकारण्यात आली. तुर्कस्तानची लोकसंख्या एकूण सव्वासात कोटी आहे. कुर्दवंशीय लोक याच्या किती प्रमाणात आहेत या आकड्यांपासूनच वाद सुरू होतो. आपल्याकडचा ओबीसी कोण या वादासारखाच हा वाद आहे. अर्थात - फरक उलट्या दिशेला आहे. ओबीसी शिक्का पडला तर आरक्षणाचा फायदा मिळण्याची शक्यता असते. पण कुर्द शिक्का पडला, तर पाकिस्तानातल्या अहमदियांसारखी सरकारी आणि सामाजिक बहिष्कृती स्वीकारावी लागेल ही भीती असते. तुर्कस्तानचा संस्थापक कमाल अतातुर्क याने तर कुर्द हे डोंगराळ प्रदेशात राहणारे तुर्कच आहेत असे जाहीर केले होते. म्हणजे, आपल्याकडच्या ईशान्य भारतातील आदिम धर्म पाळणाऱ्या अनुसूचित जमाती हिंदूच आहेत असे जाहीर करण्यासारखा हा प्रकार होता. पण हे धोरण कायदा म्हणून तुर्कस्तानात पाळले गेले. तरीही, एका अंदाजानुसार तुर्कस्तानच्या एकूण लोकसंख्येच्या वीस टक्के, म्हणजे दीड ते पावणे दोन कोटी लोक कुर्द असावेत. पण या मोठ्या जनसमूहाचे अस्तित्व नाकारण्याचे सरकारी धोरण आहे. १९९१ पर्यंत तुर्कस्तानची अधिकृत भाषा तुर्क हीच होती. (नंतर सुद्धा फार फरक पडलेला नाही.) कुर्द लोकांनी त्यांच्या भाषेत व्यवहार करणे बेकायदेशीर होते. त्यांची संस्कृती, त्यांचे वाङ्मय, त्यांचे संगीत या सगळ्यावर अधिकृत बंदी होती. कुर्द भाषाच बोलायला, शिकवायला बंदी करण्याचा परिणाम अर्थातच पुढच्या पिढ्यांवर झाला. कुर्द बहुसंख्य असणारा तुर्कस्तानचा दक्षिणपूर्व भाग मुद्दाम अविकसित ठेवण्यात आला आहे. म्हणजे दळणावळणाची साधने, वीज-पाणी पुरवठा, रस्ते, शाळा या सोई उर्वरित तुर्कस्तानच्या मानाने अगदी अपुऱ्या आहेत. नोकऱ्यांची शक्यता कमी ठेवल्याने कुर्द या प्रदेशातून उरलेल्या तुर्कस्तानमध्ये स्थलांतर करतील आणि प्रादेशिक स्वायत्ततेची मागणी कमी तीव्र होईल हा केंद्र सरकारचा डाव आहे.

या व्यवस्थात्मक वंशद्वेषाला विरोध म्हणून P.K.K. नावाची कुर्द लोकांची एक जहाल संघटना २५-३० वर्षांपासून कार्यरत आहे. तिचे आधीचे ध्येय स्वतंत्र कुर्दस्तान स्थापण्याचे होते.

या संघटनेने सशस्त्र लढा पुकारण्याचे दोन परिणाम झाले. एकतर केंद्र सरकारची दडपशाही 'अधिकृत' झाली. दुसरे म्हणजे, ही संघटना दहशतवादी आहे असे आंतरराष्ट्रीय स्तरावर जाहीर करून घेण्यात सरकार यशस्वी झाले. या दडपशाहीमुळे आजवर ४० हजारावर कुर्द ठार मारण्यात आले आहेत. आपल्याकडे 'नक्षलवादी' म्हणून जाहीर केले, की एन्काऊंटरला लोकांचा आक्षेप राहत नाही, तोच प्रकार. तसेच, माओवाद्यांचा प्रश्न आर्थिक व सांस्कृतिक असताना सरकार तो प्रश्न कायदा व सुव्यवस्थेचा आहे असे मानते. तुर्कस्तानमध्ये कुर्द संघटनांबाबत हेच घडत आहे. १९८०-९० च्या दशकात तर सरकारी अत्याचार आणखीच वाढले. कुर्द लोकांची अनेक खेडी निर्मनुष्य करण्यात आली. ३००० खेडी लष्कराने ताब्यात घेतली आणि जवळजवळ वीस लाख कुर्द सक्तीने स्थलांतरित झाले.

अगदी अलिकडची घटना म्हणजे, तुर्कस्तानमधील कुर्द लोकांना सीमेपलीकडच्या उत्तर इराकमधील कुर्द लोकांचा पाठिंबा आहे आणि काही नेते तेथे आश्रय घेत आहेत या संशयावरून या वर्षीच्या मे-जूनमध्ये तुर्कस्तानने या खेड्यांवर हवाई हल्ले केले व बॉम्ब टाकले. त्यात किती 'आतंकवादी' आणि किती निरपराध मेले याची नोंदही नाही. या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इस्तंबूल या तुर्कस्तानच्या राजधानीत P.K.K. ने रिमोट बॉम्बस्फोट केला व तीन सैनिक ठार मारले. त्यामुळे कुर्द लोकांविरुद्ध मुख्य प्रवाहाचा आकस आणखीच वाढला.

कुर्द प्रश्नाचा आणखी एक पैलू गुंतागुंत स्पष्ट करेल. कुर्द हे पारंपारिक धर्मनिष्ठ मुस्लिम आहेत. तुर्कस्तानची निर्मितीच निधर्मी राष्ट्र म्हणून झाली आहे आणि तुर्कस्तानचा आदर्श पश्चिम युरोपमधील ब्रिटन, फ्रान्स, जर्मनीसारखी राष्ट्र आहेत, कडवी धर्मनिष्ठ सौदी अरेबिया, इराणसारखी राष्ट्रे त्यांचा आदर्श नाहीत. म्हणजे, उद्या अगदी कुर्द लोकांचा स्वायत्त प्रांत स्थापन झाला, तरी तेथील अंतर्गत समाजव्यवस्था धर्ममार्तंड ठरवण्याची शक्यता आहे. म्हणजे, अफगाणिस्तानातील मूलतत्त्ववादी तालिबानसारखी धर्मांधता वाढली, तर पहिली गदा स्त्रियांवर येईल. त्यांचे शिक्षण, विवाहसंबंध, कुटुंबनियोजन करण्याचा हक्क हे सगळे लोप पावण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणजे, 'स्वायत्तते'ची प्रत्येक मागणी प्रागतिक असेलच असे नाही.

कायद्याचा विचार करता तुर्कस्तान अधिकृतरीत्या निधर्मी प्रजासत्ताक राष्ट्र आहे आणि सगळ्या नागरिकांना समान संधी व हक्क देणे हे सरकारचे कर्तव्य आहे. शिवाय, अनेक

आंतरराष्ट्रीय मानवी हक्क करार तुर्कस्तानाने मान्य केलेले आहेत. म्हणजे, कुर्द लोकांची अस्मिता सुरक्षित राखायला सरकार बांधील आहे. पण प्रत्यक्षात देशाचा स्वत:चाच कायदा धाब्यावर बसवला की आंतरराष्ट्रीय कायद्याची दखलही घेतली जाणार नाही हे उघड आहे. तुर्कस्तानच्या राष्ट्रीय उत्पन्नात अलीकडच्या काही वर्षांत ५ ते ६ टक्के दरवर्षी वाढ होत आहे. त्यामुळे तो देश प्रादेशिक सत्ता बनला आहे. हा वाढीचा दर भारताशी तुलना करण्यासारखा आहे. विकसित देशांची वाढ या दरम्यान जेमतेम एक-दोन टक्के राहिलेली आहे. म्हणजे, वाढती राष्ट्रीय संपत्ती आणि वाढते अत्याचार हे जागतिकीकरणाचे परिणाम परस्परसंलग्न आहेत.

विकसित देशात फ्रान्सचे उदाहरण घेऊ. विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत फ्रेंच वसाहती उत्तर आफ्रिकेत होत्या. फ्रान्समध्ये नंतर या देशातून अरब आणि कृष्णवर्णीय उपजीविकेसाठी आले. आज फ्रेंच लोकसंख्येच्या आठ टक्के हे लोक आहेत. बहुसंख्य गोऱ्या फ्रेंच समाजाशी त्यांचे अभिसरण नसते. ते शहराच्या परिघावर, किमान सुविधाही अपुऱ्या असणाऱ्या भागात राहतात कारण त्यांना तीच जागा परवडते. (युरोपात मध्यमवर्गीय व उच्चमध्यमवर्गीय खेड्यात राहणे पसंत करतात हे लक्षात घ्यावे.) फ्रेंच कायद्यानुसार सगळे नागरिक सारखेच. किंबहुना स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ही मूल्ये जगाला फ्रान्सने दिली असाही दावा आहे. म्हणजे, वर्ण-वंश-धर्म भिन्न असले, तरी शिक्षण, आचार-विचार-स्वातंत्र्य व मुळात अन्न-वस्त्र-निवारा हे सगळ्यांना समान दर्जाचे मिळणे ही शासकीय जबाबदारी आहे. १९७० सालापर्यंत अल्पसंख्यांकांच्या दृष्टीने फ्रान्समधील परिस्थिती बरी होती कारण कल्याणकारी राज्याकडे पैसा होता. नंतर मात्र वर्ण-वंश-धर्म द्वेष वाढीला लागले कारण स्थलांतरित एकदम वाढले. १९७० च्या दशकापासून फ्रान्समध्ये शारीरिक श्रम करू शकणाऱ्या मजुरांचा तुटवडा निर्माण झाला. मग उत्तर आफ्रिकेतून मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित झाले. ते झोपडपट्ट्यांत राहू लागले. कारण बाकी ठिकाणे त्यांना परवडण्यासारखीच नव्हती. ते परदेशी असल्याने त्यांना समाजसुरक्षेचे इतर फ्रेंच नागरिकांसारखे अधिकारही नव्हते. थोडाफार पैसा गाठीला बांधायचा आणि परत काही वर्षांनी मायदेशी जायचे हे त्यांचे तेव्हाचे उद्दिष्ट होते. त्यामुळे हे लोक 'बाहेरचे' आहेत किंवा इथे फक्त पैसे मिळवायला आले आहेत हा बहुसंख्यांक मुख्य प्रवाहाचा समज दृढ झाला. काही वर्षे गेल्यावर या लोकांच्या मूळच्या देशांची परिस्थिती त्यांच्या अपेक्षेप्रमाणे सुधारली नाही आणि ते लोक फ्रान्समध्येच स्थायिक झाले. म्हणजे, आयुष्यभर त्यांनी पदोपदी मुख्य प्रवाहाची अवहेलना सहन करत दिवस काढले. दुय्यम नागरिक म्हणून दलितांसारखेच काम केले. त्यांची मुले फ्रान्समध्येच जन्मली, वाढली आणि आज ती अधिकृत फ्रेंच नागरिकही आहेत. आधीच्या पिढीच्या दुय्यम नागरिकत्वाच्या अपमानाचा सल हा पिढीच्या मानसिकतेचा अविभाज्य भागही आहे (ही मानसिकता दलित मानसिकतेशी जुळणारी आहे.) त्यात वर्णद्वेष, आफ्रिकन जीवनपद्धतीविषयीची मुख्य प्रवाहाची तुच्छता, शिक्षणाचा अभाव आणि मुळात या लोकांना परिघावरच ठेवायचे प्रत्यक्षात धोरण (मग कायदा उलट का म्हणेना) यामुळे मुख्य प्रवाहाविरुद्ध या तरुण पिढीला कमालीचा द्वेष व राग आहे. त्यात हे उत्तर आफ्रिकन बहुधा मुस्लिम आहेत. मुख्य प्रवाह आपल्याला स्वीकारत नाही म्हटल्यावर त्यांची ही मुस्लिम अस्मिता आणखीच दृढ झाली. ही प्रक्रियाही आपल्याकडची नवबौद्ध अस्मिता प्रखर होण्यासारखी आहे.

त्यात अलिकडे, फ्रेंच पोलिसांनीही या वस्तीतील तरुण मुलांना लक्ष्य केल्यासारखे केले. जवळपास कोठेही काहीही छोटा गुन्हा झाला की या वस्तीतल्या अरब किंवा कृष्णवर्णीय तरुण मुलाला पकडून पोलीस ताब्यात घेत असत आणि विनाचौकशी दोन-चार दिवस कोठडीत डांबून ठेवत असत. शाळांमध्येही या विद्यार्थ्यांना दुय्यम वागणूक मिळत असे. सर्व नागरिक समान या धोरणामुळे २००६ पर्यंत फ्रान्समध्ये आरक्षणासारखी तरतूदही नव्हती. २००६ मध्ये ही तरतूद आली कारण २००५ मध्ये या समाजाच्या खदखदणाऱ्या असंतोषाला अचानक हिंसक वळण लागले. २००५ मध्ये पॅरिसच्या आसपासच्या उपनगरात राहणारे अनेक कृष्णवर्णीय आणि अरब समूह रस्त्यावर आले आणि सरकारविरोधी निदर्शने करू लागले. त्यात रस्त्याच्या बाजूला उभ्या केलेल्या अनेक खासगी गाड्यांना आगी लावण्यात आल्या, काही सरकारी मालमत्तेचीही नासधूस झाली. मग सरकारला जाग आली. त्यातही आपल्याकडच्या आणि विकसित देशातल्या राजकीय संस्कृतीतील फरक पाहण्यासारखा आहे. या दंगलीनंतर फ्रान्सच्या अध्यक्षाने टीव्हीवर राष्ट्राला उद्देशून भाषण केले. त्यात या लोकांना सामाजिक न्याय द्यायला देश अपुरा पडला आहे याची ग्वाही दिली आणि माफी मागितली. आपल्याकडे ही नम्रता, मग ती दांभिकही असेल, कल्पनेतही कठीण आहे. हा उद्रेक फक्त वर्ग किंवा बहुजिनसी समाजाचे अंतर्गत भेद या कसोट्यांवर पाहता येणार नाही. तर आधुनिक शहरी मुख्य प्रवाहात परिघावरच्या लोकांना किती प्रकारे अपमान सहन करावे लागतात याचे हे उदाहरण आहे.

हाच प्रकार जर्मनीत स्थलांतरित तुर्कांविरुद्ध, ब्रिटनमध्ये पाकिस्तानी लोकांविरुद्ध आढळतो. यातला गोरा निगरगट्टपणा लक्षणीय आहे. फ्रान्स, ब्रिटन यांनी दोन अडीच शतके जगात

अनेक देशांवर राज्य केले. या वसाहतीतून मिळविलेल्या संपत्तीवर त्यांची औद्योगिक क्रांती झाली आणि आजच्या समृद्धीचा पाया रचला गेला. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात वसाहती स्वतंत्र देश झाले. पण या आधीच्या वसाहतीतील स्थलांतरित या देशांना समान नागरिक म्हणून नको असतात. जोपर्यंत स्थलांतरित कोणतेही राजकीय, सामाजिक अधिकार न मागता समाजाच्या परिघावर निमूटपणे राहतात, तोपर्यंत मजूर म्हणून ते मान्य असतात. पण स्थलांतरितांनी किमान नागरी अधिकारांची मागणी सुरू केली, की बहुसंख्यांकांच्या दडपणाखाली, राज्यसंस्था या लोकांची आणखीच मुस्कटदाबी करते. हाही प्रकार जातीव्यवस्थेशी तुलना करण्यासारखा आहे. अलिकडच्या ५० वर्षांतील जातीय अत्याचारांचे स्वरूप आणि काही परदेशातील संघर्षाचे स्वरूप यातही साम्य दिसते. त्यासाठी दक्षिण आफ्रिकेचे उदाहरण घेतले आहे.

भारतातील गेल्या बरेच वर्षातील जातीय अत्याचारात, विशेषत: ग्रामीण भागातील अत्याचारात 'द्विज' जातींचा प्रत्यक्ष सहभाग जवळजवळ नव्हताच. तमिळनाडू, आंध्र, हरियाणा ते महाराष्ट्रातील खैरलांजीमधील अत्याचार प्रामुख्याने बी.सी., ओ.बी.सी. म्हणजे शूद्रांनी दलितांवर केले. जातिव्यवस्थेच्या दृष्टीने हे दोन्ही थर अगदी तळातले आहेत. मे २००८ मध्ये दक्षिण आफ्रिकेत हिंसाचाराची मोठी घटना झाली. तीही हेच चित्र दाखवते.

दक्षिण आफ्रिका हा आफ्रिका खंडातील सर्वात संपन्न देश आहे. त्यामुळे रोजगारासाठी झिंबाब्वे, मोझांबिक अशा शेजारच्या किंवा नायजेरिया, सोमालियासारख्या देशांतूनही स्थलांतरित तेथे आलेले आहेत. पाच कोटी लोकसंख्येच्या दक्षिण आफ्रिका देशात सुमारे पन्नास लाख परदेशी मजूर आहेत. कित्येकजण गेली दहा-पंधरा वर्षे दक्षिण आफ्रिकेत आहेत. त्यांचे मूळ देश दिवाळखोर तरी झाले आहेत किंवा अराजक असल्याने नोकऱ्या नसतात. हे स्थलांतरित दक्षिण आफ्रिकेतील मोठ्या शहरांच्या परिघावर झोपडपट्टयात राहतात. यातील बहुसंख्य अनधिकृतरीत्या आलेले आहेत. त्यामुळे कागदोपत्री ते अस्तित्वातच नाहीत. याच झोपडपट्ट्यांत गरीब दक्षिण आफ्रिकन राहतात. म्हणजे तेही याच आर्थिक वर्गातील लोक आहेत. सरकारी प्रचार अर्थव्यवस्थेतील अडचणींवरून लोकांचे लक्ष दुसरीकडे वळवण्याचा असतो. त्यातील एक पद्धत म्हणजे या परदेशी लोकांना गुन्हेगार ठरवणे. म्हणजे, एखाद्या नायजेरियन स्थलांतरिताने गुन्हा केला तर प्रसारमाध्यमे चित्र असे उभे करतात की सगळेच नायजेरियन चोर आहेत. अशा सततच्या गैरप्रचाराने आपल्याच शेजारी वर्षानुवर्षे राहणाऱ्या परदेशी मजुराबद्दल गरीब दक्षिण आफ्रिकनांचा राग आहे. दक्षिण आफ्रिकेत २४ टक्के बेरोजगारी आहे. जागतिकीकरणामुळे, फुटबॉल वर्ल्डकपसारखे महागडे तमाशे करण्यामुळे ही बेरोजगारी कमी होत नाही. त्याला जबाबदार हे स्थलांतरित आहेत अशी दक्षिण आफ्रिकेत तळातील स्तराची खात्री आहे. परिणामत: याच झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या दक्षिण आफ्रिकनांनी परदेशी नागरिकांवर हल्ले सुरू केले. जी काही थोडीफार चीजवस्तू असेल, ती लुटली, घरांना तर आगी लावल्याच पण माणसांनाही रस्त्यावर जिवंत जाळले. शेजारीपाजारी टाळ्या पिटत तर पोलीस मख्खपणे हे हत्याकांड पाहत होते. शेवटी लष्कराला पाचारण करावे लागले. कित्येक हजार लोक जीव वाचवण्यासाठी जवळच्या शाळा, चर्चेस, पोलीस स्टेशन अशा ठिकाणी अंगावरच्या कपड्यानिशी पळाले. ज्यांना शक्य होते ते रिक्तहस्ते मायदेशी परतले. सर्वहारांनी सर्वहारांचे शोषण करावे हा तर थोडीफार जमीन असणाऱ्या व राजकीयदृष्ट्या समर्थ बनत असलेल्या बी.सी., ओ.बी.सी. विरुद्ध दलित या संघर्षाहून खालच्या पातळीचा प्रकार आहे.

वरील उदाहरणांवरून पुढील गोष्टी लक्षात याव्यात. एकतर राज्यसंस्था लोकशाही, लष्करशाही किंवा हुकूमशाही कोणत्याही प्रकारची असली किंवा समाज विकासाच्या कोणत्याही टप्प्यावर असला, तो समाज कोणत्याही धर्माचा किंवा निधर्मी म्हणवून घेणारा असला, कितीही सुशिक्षित असला तरी जातीय अत्याचार होतातच.

जागतिकीकरणाने देशांची आर्थिक स्वायत्तता जशी कमी होत आहे, तसा अंतर्गत असंतोष वाढत आहे आणि त्याच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी लष्कर, निमलष्करी दले यांचा वापरही वाढत आहे. खुल्या अर्थव्यवस्थेचा फायदा आहे रे गटालाच मिळत असल्याने पद्धतशीर दरिद्रीकरण व गुन्हेकारीकरणही वाढत आहे. या गुन्हेगारीकरणाला राज्यसंस्थेचा लष्कराचा वापर हा आदर्श आहे. म्हणजे रूढ वर्ग, परंपरा आणि जागतिकीकरणाची वरील अंगे या सगळ्याचाच जातीय हिंसाचार वाढण्यात भाग आहे.

तरीही कोणताही सामूहिक हिंसाचार एक विशिष्ट विकृत रूपच का घेतो याचे उत्तर वर्ग-परंपरा-जागतिकीकरण या संदर्भचौकटीने समाधानकारकरीत्या मिळत नाही. 'विद्रोही'तील मुंबई हत्याकांडांवरील लेखातही मी याच निष्कर्षाला आलो होतो. पुरातत्त्वशास्त्रीय दृष्ट्या या हिंसाचाराचा अभ्यास ही जास्तीची गरज दिसते. त्या अंगाने पुरातन आदिम समाजाच्या पावित्र्य, भीती, दृष्टप्रवृत्ती, तंत्र-मंत्र, जादूटोणा या कल्पनांचा वर्तमान परिस्थितीत अभ्यास होणे आवश्यक आहे.

वर उल्लेख केलेल्या हुतू-तुत्सी संघर्षातील हिंसाचाराचा असा थोडाफार अभ्यास झाला आहे. त्यावरून नक्की शत्रू

कोण या संदिग्धतेचा हिंसाचारात मोठा वाटा असावा, असे वाटते. म्हणजे, समोरच्या माणूस तुत्सी आहे हे नक्की पण तो आपल्यापेक्षा फारसा निराळा तर दिसत नाही. मग त्याला ठार मारायचे का नाही, किंवा का ठार मारायचे हा संदेह निर्माण होतो. या संदेहाची निश्चिती करण्यासाठी 'शत्रू'चे शरीर ही कसोटी ठरवली जाते. प्रागैतिहासिक विश्वासानुसार शत्रूच्या शरीरात दुष्ट प्रवृत्ती असतात. या दुष्ट प्रवृत्तींचा शोध घेणे जरूरीचे असते. नाहीतर त्या प्रवृत्ती आपलाच नाश करण्याची भीती असते. म्हणून 'शरीर' ही निश्चिती झाली, की मृत्यूनंतरही त्या शरीराची चिरफाड केली जाते, विटंबना केली जाते. पावित्र्याचे रूढ संकेत झुगारण्याचीही ही उर्मी असते. या पुरुषांची व स्त्रियांची जननेंद्रिये, गुदद्वारे यावर जास्त लक्ष दिले जाते. हुतू-तुत्सी हत्याकांडांत गुदद्वारात टोकदार लांब लाकूड घालून ते कवटीपर्यंत खुपसण्याचे अनेक प्रकार झाले होते. गर्भार स्त्रियांचे गर्भ काढून घेऊन ते त्यांनाच खाण्याची सक्ती करणे, मानवी विष्ठा खायला भाग पाडणे असे विकृत रूप या सामूहिक हिंसाचारात आढळले होते.

'समूह' ही संकल्पना असते. पण समोरची एक-दोन-दहा माणसे, त्यांची घरे ही निश्चिती असते. 'दलित' या समूहाला वास्तवात आकार नसतो, तो आकार देणे प्रथम आवश्यक असते, तसा आकार दिल्यावरच त्या दलिताला ठार मारता येते.

१९६८ मध्ये चीनमध्ये माओने पुकारलेल्या सांस्कृतिक क्रांतीच्या उत्तरार्धात पोलिसांनी आणि लष्करानेच वर्गशत्रू, क्रांतीशत्रू ठरवले. एखाद्या गावातील एखाद्या माणसाला बुद्धिजीवी संबोधून ठार मारण्यात येत असे. प्रेताचे कोणते अवयव तोडायचे, ते कसे शिजवायचे आणि खायचे याची पद्धतच तयार झाली होती. १९९० च्या दशकात बोस्नियातील (युगोस्लावियाचा एक भाग) वंशयुद्धात अनेक कॉन्संट्रेशन कँपस् उभारले गेले. त्यात कैद्यांची जननेंद्रिय कापून इतर कैद्यांना ती खायला लावण्याचे प्रकार घडलेले आहेत.

खैरलांजीतही ही 'शारीरिक' निश्चिती भोतमांगे कुटुंबीयांबाबत झालेली दिसते. इतर दोन दलित कुटुंबांना वगळण्यात आले. भोतमांगे महिलांनी आधी विरोधी साक्ष देणे, ते कुटुंब स्वयंपूर्ण असणे, त्यांची स्वत:ची जमीन असणे किंवा मुले शाळा-कॉलेजात जाणे ही कारणे एका मर्यादेपर्यंत हा अत्याचार का झाला याचा खुलासा करतात. पण भोतमांगे कुटुंबच का याचे पूर्ण उत्तर मिळत नाही. सवर्णांना अशीच कारणे इतरही दोन दलित कुटुंबांविरुद्ध रचता आली असती.

त्यामुळे वर्गमीमांसा, परंपरा आणि जागतिकीकरण या बरोबरच पुरातत्त्वशास्त्रीय चौकटीची जोड देणे जरूरीचे वाटते. जातीय किंवा जातसदृश अत्याचार समजण्यासाठी आहे ती संदर्भचौकट त्यायोगे विस्तारली जाईल.

चन्द्रशेखर पुरन्दरे
Email - artnondeco@yahoo.co.uk
Website - www.art-non-deco.com

❐